# मराठी कादंबऱ्यांतील मुस्लीम समाजजीवन

प्राचार्य डॉ. राजेखान शानेदिवाण

मराठी कादंबऱ्यांतील

# मुस्लीम समाजजीवन

प्राचार्य डॉ. राजेखान शानेदिवाण

निर्मिती प्रकाशन, कोल्हापूर

## मनोगत...

मला शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरने २००४ साली पीएच. डी. पदवीने सन्मानित केले. या घटनेला वीस वर्षे होत आली. वीस वर्षानंतर प्रबंध आवश्यक सुधारणांसह ग्रंथरुपाने प्रकाशित होत आहे. विलंब झाला पण मला आनंद या गोष्टीचा आहे की आपण केलेले संशोधनाचे काम केवळ विद्यापीठाच्या ग्रंथालयात न राहता वाचक, संशोधकांसाठी उपलब्ध होत आहे.

मराठी कादंबरीतील मुस्लीम समाजजीवन या विषयांतर्गत माझे संशोधन काम पूर्ण झाले. मराठी साहित्य विश्वातील नामवंत लेखक, समीक्षक प्रा. डॉ. राजन गवस यांनी मला मार्गदर्शन केले. साधारणपणे अडीच-तीन वर्षामध्ये ही प्रक्रिया पूर्ण झाली. संशोधनाची शिस्त नजरेसमोर ठेऊन डॉ. राजन गवस यांनी सदरचे काम करवून घेतले. त्यांनी केलेल्या सूचना आणि संबंधित विषयाकडे पाहताना आपला दृष्टीकोन कसा असायला हवा, ग्रंथांची निवड कशी करावी, नोट्स कशा तयार कराव्यात, कोणत्या अभ्यासकांना भेटावे, चर्चा करावी या संदर्भाने केलेले मार्गदर्शन खूपच उपयुक्त ठरले.

प्रस्तुत अभ्यास विषयाच्या अनुषंगाने मराठी साहित्य समीक्षेच्या क्षेत्रात फारसे काम झालेले नव्हते. अगदी हाताच्या बोटावर मोजता येतील अशा संशोधकानी लेख किंवा पुस्तिका या स्वरूपात मांडणी केली होती. सदरची मांडणीही संशोधनाची शिस्त नजरेसमोर ठेवून केली होती असेही नाही. या विचारवंतानी वापरलेली ग्रंथसंपदा, संदर्भ साधनेही मर्यादित होती. असे असले तरी त्यांच्या संशोधनाने मला दिशा मिळाली हे नाकारता येणार नाही. पण ही दिशा निश्चित करताना आपल्या संशोधनाचा परिघ किंवा अवकाश कसा असावा याचीही निश्चिती होत होती. या संदर्भाने डॉ. राजन गवस यांच्याशी वारंवार चर्चा करून आराखडा निश्चित केला. ज्यामुळे दीड-पाऊणेदोनशे वर्षामध्ये प्रकाशित झालेल्या कादंबऱ्यातील मुस्लीम समाजजीवनाचा संशोधनाच्या पातळीवरील अभ्यास करणे सुलभ झाले.

मराठी कादंबऱ्यातील मुस्लीम समाजजीवनाचा शोध घेत असताना सर्वप्रथम

प्राचार्य डॉ. राजेखान शानेदिवाण
४३ सोनसावली, नर्मदा पार्क,
इंगवले कॉलनी, फुलेवाडी
कोल्हापूर-४१६०१०
मो. ९९६०९९५८५३




मराठी कादंबऱ्यांतील मुस्लीम समाजजीवन या अभ्यास विषयाच्या अनुषंगाने मराठी साहित्य समीक्षेच्या क्षेत्रात फारसे काम झालेले नव्हते. अगदी हाताच्या बोटावर मोजता येतील अशा संशोधकानी लेख किंवा पुस्तिका या स्वरूपात मांडणी केली होती. सदरची मांडणीही संशोधनाची शिस्त नजरेसमोर ठेवून केली होती असेही नाही. या संशोधकांनी वापरलेली ग्रंथसंपदा, संदर्भ साधनेही मर्यादित होती. असे असले तरी त्यांच्या संशोधनाने मला दिशा मिळाली हे नाकारता येणार नाही. पण ही दिशा निश्चित करताना आपल्या संशोधनाचा परिघ कसा असावा याचीही निश्चिती होत होती. या संदर्भाने मार्गदर्शकांशी वारंवार चर्चा करून आराखडा निश्चित केला. ज्यामुळे दीड-पाऊणेदोनशे वर्षामध्ये प्रकाशित झालेल्या महत्त्वपूर्ण कादंबऱ्यातील मुस्लीम समाजजीवनाचा संशोधनाच्या अंगाने अभ्यास करणे सुलभ झाले.


ग्रंथ हवा असल्यास...
फोन/गुगल पे नंबर
९८२२४७२१०९
NIRMITI PRAKASHAN
Scan & Pay



रु. ३००/-

निर्मिती प्रकाशन
८७३, क/२, सी वॉर्ड, सिध्दीश्री प्लाझा,
राजाराम रोड, कोल्हापूर - ४१६००२
मो. ९८९०५५४३४०, ९८२२४७२१०९

ISBN : 978-93-92922-91-6